## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८२९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/१२/२०१६

**१) रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/१२/२०१६ रोजी १०.३० वा. ते १६/१२/२०१६ रोजी १५.३० वा. पर्यत यातील आरोपीचे ढिवरवाडा शेतशिवारातील गट क्र. २७ क्षेत्र १. ३४ हेक्टर आर पैकी अंदाजे ०.१५ हेक्टर आर जागेत ७० ब्रास चोरीची रेती अंदाजे कि. १,०५०००/–रु. चा अवैद्यरेती असलेला साठा आरोपीने विल्हेवाट लावले असल्याचे फिर्यादी श्री धनंजजय देशमुख तहसिलदार मोहाडी चे वतीने नियुक्त केलेले पत्रा अन्वये मलीक अहमद अब्दुल हकीम खॉ पठाण वय ४९ वर्ष, रा. राजीव गांधी चौक खॉन मॅरेज हॉल जवळ भंडारा नौकरी मंडळ अधीकारी करडी यांचे चौकशी वरुन निष्पन्न झाल्याने पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९,१०९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नदेश्वर पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल स्लीप होवुन दोन जखमी . :–**

दिनांक १८/१२/२०१६ रोजी ११.३० वा. दर. यातील फिर्यादी उमराव जगत वंजारी वय ५४ वर्ष, रा. आवरमारा हा आरोपीची मोटार सायकल क्र. एमएच ३६ डी ४२०१ वर मागे बसुन पेट्रोल पंप मार्गे गोपेवाडा येथे जात असता यातील आरोपीने आपल्या ताब्यातील मोटार सायकलल हयगयीने व निष्काळजीपने चालविल्याने मोटार सायकल स्लीप होवुन आरोपी व फिर्यादी खाली पडल्याने आरोपीने डावे पायाला मार लागुन फॅक्चर होऊन व फिर्यादीच्या डाव्या हाताला व पायाला खरचटलेला मार लागल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जनबंधु पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक १८/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा व जवाहरनगर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १६० किलो मोहफुला + मोटार सायकल कि. १२,५००/–रू. चा माल जप्त करण्यात आला .

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १८/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ६४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०३ केसेस व ईतर वाहनांवरती ६१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ७५८८५६३३३५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.